महाराष्ट्र विधानपरिषद

दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२५

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - २०

ममदापूर (ता.येवला जि.नाशिक) संवर्धन राखीव क्षेत्रातील देवदरी येथे वनउद्यान विकसित करून संशोधन केंद्र मंजूर करण्याबाबत

(१) १९१७ (१५-०४-२०२५) श्री.पंकज भुजबळ : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ममदापूर (ता.येवला, जि.नाशिक) संवर्धन राखीव क्षेत्रातील देवदरी येथे वनउद्यान विकसित करणे आणि या क्षेत्रामध्ये काळवीट अपंगालय तसेच गवती रोपवाटीकेचा विस्तार करून संशोधन केंद्र मंजूर करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २९ जानेवारी, २०२५ रोजी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संशोधन केंद्र मंजूर करण्यासाठी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री.गणेश नाईक (२५-०६-२०२५) : (१) हे खरे आहे.

(२) ममदापुर संवर्धन राखीव येथे काळवीट अपंगालय, वनपर्यटनाला चालना मिळण्यासाठी ममदापुर किंवा देवदरी येथे वनउद्यान विकसित करणे तसेच ममदापुर संवर्धन राखीव क्षेत्रातील गवती रोपवाटिकेचा विस्तार करुन संशोधन केंद्र स्थापन करणेबाबत या तीन बाबींसाठी जागा निवडीचे काम व DPR तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

माध्यमिक शिक्षणाधिकारी परभणी यांच्या अकार्यक्षमतेबाबत

(२) १३८३८ (२५-०८-२०२२) श्री.सतिश चव्हाण : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील माध्यमिक शिक्षणाधिकारी ह्या शिक्षणाधिकारी पदावरील कर्तव्य पार पाडण्यास अकार्यक्षम असल्याबाबत जिल्हाधिकारी परभणी यांनी सन २०२२ दरम्यान जिल्हा परिषदेस नोटीस जारी

केली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, माध्यमिक शिक्षणाधिकारी यांची यापूर्वीच्या विविध गैरप्रकार व नियमभंगाची चौकशी आयुक्त शिक्षण पुणे यांच्या स्तरावरून करण्यात आली आहे काय, याबाबतची थोडक्यात सविस्तर माहिती काय आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.दादाजी भुसे (१४-१०-२०२२) : (१) हे खरे नाही, जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे प्राप्त तक्रारीस अनुसरुन त्यांनी दिनांक २६/०४/२०२२ च्या पत्रान्वये श्रीम गरुड, शिक्षणाधिकारी (माध्य.) यांना नोटीस बजावून अनुपालन अहवाल व खुलासाा मागविला आहे.
(२) व (३) श्रीम.गरुड यांच्याविरुध्द ई-लर्निंग साहित्य खरेदी करताना केलेल्या अनियमिततेप्रकरणी शासनाच्या दिनांक ३०/०७/२०१९ च्या ज्ञापनान्वये विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे.
तसेच, परभणी जिल्ह्यातील खाजगी शिक्षण संस्थेत नियमबाह्य शिक्षक भरती करणाऱ्या शिक्षणाधिकाऱ्यांविरुध्दच्या तक्रारींच्या अनुषंगाने श्री.दिपक चवणे, शिक्षण उपसंचालक (माध्य. व उच्च माध्य.), शिक्षण संचालनालय, पुणे यांनी केलेल्या चौकशीच्या अनुषंगाने अहवाल शासनास सादर करण्यात आला असून त्यानुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

भिवापूर, (जि.नागपूर) येथील मिरची उत्पादनावर विविध रोगांचा प्रादुर्भाव झाल्याबाबत

(३) १९०६६ (०८-०८-२०२३) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव : सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवापूर तालुक्यातील (जि.नागपूर) मिरची उत्पादनावर विविध रोगाचा प्रादुर्भाव व वातावरणाच्या बदलामुळे परिणाम झाला असून नागपूर जिल्ह्यामध्ये खरीप हंगामात १५०-२०० हेक्टरमध्ये मिरची लागवड करण्यात आली असून हायब्रिड मिरचीच्या तुलनेमध्ये पारंपरिक मिरचीचे मोठ्या प्रमाणात उत्पादन घटले आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, भिवापूरमध्ये मिरचीचे क्लस्टर करून मिरची उत्पादनाच्या वाढीसाठी १० कोटी रुपये शासनाने मंजूर केले असून शेतकऱ्यांना याचा प्रत्यक्षात आर्थिक लाभ मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व यासाठी किती कालावधी लागणारआहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.भरत गोगावले (०३-०२-२०२५) : (१) हे खरे नाही.
(२) राज्यातील सुक्ष्म व लघु उपक्रमांच्या सर्वांगिण विकासासाठी राबविण्यात येत असलेल्या महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास योजनेंतर्गत भिवापूर येथील मिरची व मसाले उत्पादनावर आधारीत उद्योग घटकांचे ०२ प्रकल्प विकासासाठी हाती घेण्यात आले आहेत. त्यापैकी एक प्रकल्पांतर्गत उच्च तंत्रज्ञानावर

आधारीत सामायिक सुविधा उभारणीसाठी रुपये ५.९० कोटी इतक्या प्रकल्प किंमतीस मंजूरी देण्यात आली आहे. त्याअंतर्गत रुपये ४.७१ कोटी इतकी रक्कम राज्य शासनाच्या अनुदानापोटी मंजूर करण्यात आली आहे. सदर प्रकल्पाची उभारणी सुरू असून राज्य शासनाचे मंजूर अनुदान योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आवश्यक परिणामकारक टप्पे पूर्ण केल्यानंतर संबंधित प्रकल्पास वितरीत करण्यात येणार आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील जुन्या व जीर्ण झालेल्या शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळांच्या इमारतीचे बांधकाम करणेबाबत

(४) १९४६८ (०४-०८-२०२३) श्री.किरण सरनाईक : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जुन्या व जीर्ण झालेल्या शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळांच्या इमारतीचे बांधकाम करणे गरजेचे असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार राज्यातील जुन्या व जीर्ण झालेल्या शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळांच्या इमारतीचे बांधकाम करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा.डॉ. अशोक उईके (२८-०२-२०२५) : (१) होय, अंशत: खरे आहे.
(२) आदिवासी विकास विभागांतर्गत ४९७ शासकीय आश्रमशाळा असून त्यापैकी अधीक्षक अभियंता सा.बां. (आदिवासी) मंडळ नाशिक अंतर्गत १०४ तसेच अधीक्षक अभियंता सा.बां. (आदिवासी) मंडळ नागपूर अंतर्गत १५ अशा एकूण ११९ जुन्या व जीर्ण झालेल्या शासकीय आश्रमशाळांची बांधकामे प्रगतीपथावर आहेत. जागा व निधीच्या उपलब्धतेनुसार नव्याने आश्रमशाळा इमारतींची बांधकामे टप्प्याटप्प्याने अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यात येत आहेत.

शासकीय आश्रमशाळा / वसतिगृह देखभाल व दुरुस्ती योजना राबविण्याबाबत दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये कार्यप्रणाली निश्चित करण्यात आलेली असून त्यानुसार आश्रमशाळा/वसतिगृह इमारतींची देखभाल व दुरुस्तींची कामे हाती घेण्यात आली आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील बी.एस.सी.हॉटेल मॅनेजमेंट आणि कॅटरिंग टेक्नॉलॉजी तसेच बीटेक हॉटेल मॅनेजमेंट अभ्यासक्रमाबाबत

(५) २०८६२ (०४-०८-२०२३) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव :सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अनेक वर्षापासून बी.एस.सी.हॉटेल मॅनेजमेंट आणि कॅटरिंग टेक्नॉलॉजी तसेच बी टेक हॉटेल मॅनेजमेंट या अभ्यासक्रमातून लाखो विद्यार्थ्यांनी पदवी, पदविका व पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केले आहेत,

हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इतर अनेक अभ्यासक्रमाच्या तुलनेत या अभ्यासक्रमातील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना कोणतीही शासकीय नोकरी अथवा योजनेचा प्रत्यक्षात लाभ मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना परवाना देऊन त्यांच्या क्षेत्रातील व्यवसायासाठी प्राधान्य देण्याबाबत शासन धोरणात्मक निर्णय घेणार आहे काय,
(४) नसल्यास, त्यामागील सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (२२-११-२०२३) : (१) अंशत : खरे आहे.

राज्यात शासकीय व अशासकीय विनाअनुदानित हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदविका व पदवी अभ्यासक्रमांच्या एकूण १४ संस्था असून त्यांची एकूण प्रवेश क्षमता १०५६ इतकी आहे.
(२) हॉटेल मॅनेजमेंट ॲड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदविका आणि पदवी अभ्यासक्रम हा प्रामुख्याने रोजगाराभिमुख आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण करणारे विद्यार्थी स्वत:चा व्यवसाय, उद्योगधंदा सुरू करु शकतात. तसेच हा अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना खाजगी आस्थापना, भारतीय रेल्वे, सैन्यदल,वायूदल, नौदल, राजभवन, महाराष्ट्र सदन, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, राष्ट्रीयकृत बँका त्याचप्रमाणे शासकीय हॉटेल मॅनेजमेंट आणि कॅटरींग टेक्नॉलॉजी पदविका आणि पदवी अभ्यासक्रमाच्या शिक्षण संस्थांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

होमी भाभा युनिर्व्हसिटी मध्ये वरिष्ठ प्राध्यापकांना डावलून कनिष्ठ प्राध्यापकांची नियुक्ती केल्याबाबत

(६) २०९५२ (०४-०८-२०२३) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डॉ. होमीभाभा युनिर्व्हसिटीची नुकतीच स्थापना झाली असून त्याकरीता शैक्षणिक परिषदेची(Academic Council) निर्मिती व त्यावर प्राध्यापकांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नियुक्त्या करतांना वरिष्ठ प्राध्यापकांना डावलून त्यांच्यापेक्षा कनिष्ठ प्राध्यापकांची या समित्यांवर नियुक्ती करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पुनश्च: नवीन यादी बनवून वरिष्ठ अधिकाऱ्यांना या समित्यांवर प्राधान्याने नियुक्ती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०७-१२-२०२३) : (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

(३) दिनांक १३/२/२०१९ अधिसुचनेतील तरतूदीनुसार विद्यापरिषद पुनर्स्थापीत करण्याची कार्यवाही विद्यापीठ स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

शालेय पोषण आहार योजनेसाठी मागील ५ वर्षात ठेकेदारांनी भरलेल्या निविदांबाबत

(७) २१०२९ (२२-११-२०२३) श्री.एकनाथराव खडसे : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शालेय शिक्षण विभागाकडून शालेय पोषण आहार योजना राबविण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजना कधीपासून सुरु करण्यात आली आहे, तसेच गत ५ वर्षात वर्षनिहाय किती तरतूद करण्यात आली व प्रत्यक्षात किती खर्च करण्यात आला आहे,
(३) असल्यास, शालेय पोषण आहार योजनेसाठी गत ५ वर्षात किती ठेकेदारांनी निविदा भरल्या व सदर निविदांची रक्कम किती होती व निविदा प्रक्रीयेतंर्गत निविदा भरलेल्या ठेकेदारांची नावे काय आहेत तसेच प्रत्यक्ष ठेका देण्यात आलेल्या ठेकेदारांची नावे काय आहेत,
(४) असल्यास, सदर योजनेंतर्गत ठेकेदारांना ठेका देण्यासाठी अटी व शर्ती काय आहेत, तसेच या योजनेंतर्गत जिल्हानिहाय किती विद्यार्थ्यांनी लाभ घेतला आहे ?

श्री.दादाजी भुसे (१६-०५-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.
प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना (पूर्वीची शालेय पोषण आहार) केंद्र शासनाच्या निर्देशानुसार राज्यामध्ये राबविली जाते.
(२) प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेसाठी दरवर्षी केंद्र शासनाच्या प्रकल्प मंजूरी मंडळाच्या (PAB) बैठकीमध्ये वार्षिक कार्यक्रम व अंदाजपत्रक मंजूर केले जाते. तसेच, केंद्र शासनाने प्रति दिन प्रति विद्यार्थी आहार खर्च मर्यादा निश्चित केली आहे. त्यानुसार सदर मर्यादेमध्येच योजनेंतर्गत खर्च करण्यात येतो. तसेच, सन २०१९-२० मध्ये रुपये १४६९.२४ कोटी, सन २०२०-२१ मध्ये रुपये १४३८.२५ कोटी, सन २०२१-२२ मध्ये रुपये ९२८.४८ कोटी, सन २०२२-२३ मध्ये रुपये २१५८.९७ कोटी व सन २०२३-२४ मध्ये रुपये १९३९.३७ कोटी इतका खर्च योजनेंतर्गत करण्यात आला आहे.
(३) व (४) केंद्र शासनाच्या निर्देशानुसार शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, शासकीय अनुदानित व अंशत: अनुदानित इ.१ ली ते इ.८ वीच्या वर्गातील सुमारे ९८,९२,८७७ विद्यार्थ्यांना प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत पोषण आहाराचा लाभ देण्यात येतो. यासाठी तांदूळ वाहतूक व धान्यादी मालाचा पुरवठा करण्यासाठी शिक्षण संचालक (प्राथ.) यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय खरेदी समितीमार्फत ई-निविदा प्रक्रियेव्दारे जिल्हानिहाय पुरवठादार नियुक्त करण्यात येतात. सदर ई-निविदा प्रक्रिया शासनाचे खरेदी धोरण दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ नुसार राबविण्यात येते. सदर निविदा प्रक्रियेच्या अटी व शर्ती सदर खरेदी धोरणातील तरतूदीनुसार प्रकल्प अंमलबजावणी समितीमार्फत (PIC) निश्चित केल्या जातात.
सदर योजनेंतर्गत तांदूळ वाहतूक व धान्यादी मालाचा पुरवठा करण्याकरीता राबविण्यात आलेल्या सन २०१९-२० या वर्षाकरीता १६८ निविदाकारांनी, सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाकरीता १५१ निविदाकारांनी तसेच, सन २०२२-२४ या दोन वर्षाकरीता १५६ निविदाकारांनी सहभाग नोंदविला होता.

ठाणे जिल्ह्यातील दापूरमाळच्या खोरगडवाडी आणि ठाकूरपाडा या वस्त्यांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

(८) २१०४० (२२-०२-२०२४) श्री.सुनिल शिंदे : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापूरमाळ, (जि.ठाणे) येथील खोरगडवाडी आणि ठाकूरपाडा या पाड्यांमध्ये सुमारे ५० हून अधिक आदिवासी कुटुंबे वास्तव्यास असून तेथे रस्ते, वीज, पाणी, आरोग्य आणि शिक्षण यांसारख्या पायाभूत सुविधा अद्यापही पोहचल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दापूरमाळ, (जि.ठाणे) येथील खोरगडवाडी आणि ठाकूरपाडा या वस्त्यांना मूलभूत सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

प्रा.डॉ. अशोक उईके (१९-०२-२०२५) : (१) व (२) दापूरमाळ गावात ४५ आदिवासी कुटुंबाची वस्ती असून तेथे २७२ इतकी लोकसंख्या आहे. सदर गावातील पायाभूत सुविधांची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे

अ) रस्ते- बांधकाम जि.प. उपविभाग, शहापूर यांनी दापूरमाळ या गावाला जोडणाऱ्या रस्त्याचे रुपये ९२४.०० लक्षचे अंदाजपत्रक तयार केले असून सदर अंदाजपत्रक बांधकाम विभाग, जि.प. ठाणे यांना दिनांक १४/०७/२०२३ रोजी पाठविण्यात आले आहे. सदरचा रस्ता ४ कि.मी. लांबीचा असून त्यापैकी २ कि.मी. खाजगी मालकीचा व उर्वरीत २ कि.मी. वन विभागाच्या हद्दीत येतो. वन हद्दीतील रस्त्याच्या लांबीचे अधिग्रहणाबाबतचा ३/२ चा प्रस्ताव सा.बां.उपविभाग क्र.२, शहापूर, जि.ठाणे यांचे मार्फत वनविभाग, खर्डी, ता.शहापूर, जि.ठाणे यांना सादर करण्यात आला आहे.

ब) वीज- दापूरमाळ येथील खोरगडवाडी आणि ठाकूरपाडा या पाड्यांमध्ये विद्युतसुविधा उपलब्ध आहे.

क) पाणीपुरवठा- दापूरमाळ येथील खोरगडवाडी आणि ठाकूरपाडा या पाड्यांकरीता वैतरणा धरणाच्या पाणी फुगवट्यातून पाणी उचलून नळ पाणीपुरवठा योजना जिल्हा परिषदेमार्फत प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

ड) आरोग्य- दापूरमाळ येथून ९ कि.मी. अंतरावर विहीगांव येथे आरोग्य उपकेंद्र उपलब्ध आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र कसारा येथून डॉक्टर व समुदाय विकास अधिकारी नियमित भेटी देवून आरोग्य तपासणी, नियमित लसीकरण सत्राचे आयोजन करतात. उपकेंद्र विहिगांव येथून आरोग्यसेवक/सेविका महिन्यातून दोन वेळा घरोघरी भेटी देवून आजारांचे सर्वेक्षण करतात. उपकेंद्र विहिगांव येथून आरोग्य सेवक/सेविका यांच्या मार्फत लसीकरण सत्राचे आयोजन, गरोदर माता नोंदणी, गरोदर/प्रसुती झालेल्या मातांची तपासणी, ०-६ गटातील बालकांची उंची-वजन, पोषण याची माहिति घेतली जाते.

इ) शिक्षण- दापूरमाळ येथे इ. ५ वी पर्यंत जिल्हा परिषद शाळा आहे. तसेच तेथे अंगणवाडी केंद्र देखील आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या पगारापेक्षा एजन्सीला जादाचे कमिशन दिले जात असल्याबाबत

(९) २१३०८ (०३-०१-२०२४) श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर : सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांच्या पगारावर होणारा भरमसाठ खर्च आटोक्यात आणण्यासाठी राज्य शासनाने कंत्राटी पदभरतीच्या घेतलेल्या निर्णयामुळे काटकसर होण्यापेक्षा कर्मचारी पुरविणाऱ्या एजन्सीला मोठ्या प्रमाणात रक्कम अदा केली जात असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, रोजगार हमी योजनेत कंत्राटदार पध्द्तीने नेमलेल्या १२६६ कनिष्ठ अभियंत्यांना मासिक पगारापोटी राज्य शासनाने ३ कोटी ५० लाख रुपये अदा केले मात्र त्यापोटी एजन्सीला एका महिन्यासाठी जवळपास एक कोटी रुपये अदा करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने इतक्या मोठ्या प्रमाणात एजन्सीला कमिशन देण्याची कारणे काय आहेत, याबाबत चौकशी करुन सदर निर्णयात बदल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्यामागील सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री.भरत गोगावले (०३-०३-२०२५) : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

वाशिम जिल्ह्यामध्ये सोयाबीन या पिकाशी निगडीत व्यवसाय उभारणेबाबत

(१०) २१४९८ (०५-०१-२०२४) श्री.किरण सरनाईक : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हा हा औद्योगिक दृष्ट्या अत्यंत मागासलेला व उपेक्षित जिल्हा असून वाशिम जिल्ह्यामध्ये मागील अनेक वर्षांपासून शासनामार्फत सोयाबीन या पिकाशी निगडीत उद्योगधंदे नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने वाशिम जिल्ह्यामध्ये सोयाबीनचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे सोयाबीन या पिकाशी निगडीत व्यवसाय उभारणेबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उदय सामंत (२८-०५-२०२५) : (१) हे खरे नाही.

वाशिम जिल्ह्यामध्ये सोयाबीन या पिकाशी निगडीत खालीलप्रमाणे उद्योग घटक कार्यरत आहेत.

अ.क्र.	उद्योग घटकाचे नाव	एकूणगुंतवणूक (रुपये)	रोजगार उत्पादन प्रतिदीन
१.	काळूराम फुड प्रॉडक्ट प्रायव्हेट लिमिटेड,वाशिम	३५.०० कोटी	४२ ११० टन
२.	रुची सोया उद्योग वाशिम	९२.१०कोटी	२५० १००० टन
३.	माऊली इंडस्ट्रिज रिसोड (मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम)	०.४० कोटी	२० १.२ टन
४.	"एक जिल्हा एक उत्पादन" या योजनेंतर्गत ४९ सूक्ष्म उद्योगांची नोंदणी झालेली आहे	१.५० कोटी	२०० ४.५२१ टन

(२) "एक जिल्हा एक उत्पादन" योजनेंतर्गत वाशिम जिल्ह्यासाठी सोयाबीन उत्पादने या कृषी आधारीत उद्योग घटकाला स्थान देण्यात आले आहे. सोयाबीन या पिकाशी निगडीत वाशिम जिल्ह्यातील उद्योग घटकांकडून सोयाबीन आधारीत उत्पादने तयार करुन निर्यात केली जातात. महाराष्ट्रातील एकूण उत्पादनाच्या निर्यातीमध्ये चालू आर्थिक वर्षात रुपये ११.८१ कोटी रुपयांची निर्यात करण्यात आली आहे.

वाशिम जिल्हा आकांक्षित जिल्हा असल्यामुळे सामुहिक प्रोत्साहन योजना-२०१९ अंतर्गत स्थिर भांडवली गुंतवणूकीच्या १०० टक्के प्रमाणात अनुदान दिले जाते. त्यानुसार वाशिम जिल्ह्यात सोयाबीन उत्पादनावर आधारीत नवीन उद्योग घटकांसाठी व्याज अनुदान, वीज अनुदान, विक्रीकर परतावा अनुदान हे लाभ जिल्हा उद्योग केंद्राकडे अर्ज केल्यास शासनाच्या नियमानुसार देण्यात येतात.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम व प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम या योजनेंतर्गत उद्योग घटकाला १५ ते ३५ टक्के प्रमाणात अनुदान देण्यात येऊन उद्योग वाढीसाठी शासनातर्फे चालना देण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

पुणे शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्याबाबत

(११) २२०५३ (०५-०१-२०२४) श्री.सत्यजीत तांबे : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील चांदणी चौक येथील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी उभारण्यात आलेला प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतरही वाहतूक कोंडी कायम असून मार्गदर्शक फलक योग्य ठिकाणी न बसविल्यामुळे तसेच काही ठिकाणी मार्गदर्शक फलक नसल्यामुळे वाहन चालकांची गैरसोय होत असल्याची बाब माहे, ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाने काही ठिकाणी लावलेले फलक वाहनचालकांना न-दिसणारे असून काही रस्त्यांजवळ अद्यापही फलक न लावल्यामुळे रस्ता चुकल्यावर वाहनचालकांना किमान दोन किलोमीटरचा जादाचा प्रवास करावा लागत असल्याने वाहनचालकांची मोठया प्रमाणात

गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चांदणी चौक येथील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी परिसरातील जुना पूल पाडून रस्त्याच्या मार्गिकेचे काम त्वरित करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१२-०६-२०२५) : (१) हे खरे नाही.

ठाणे-पुणे-सातारा-कोल्हापूर महामार्ग क्र. ४८ भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेकडे असून पुणे शहरातील चांदणी चौक हा रा.म.क्र.४८ चा भाग आहे. चांदणी चौक येथील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी उभारण्यात आलेला प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर, सदर प्रकल्पांतर्गत सर्व बाजूंना जाणाऱ्या ८ रॅम्प, दोन्ही बाजूचे सेवा रस्ते, मुख्य महामार्गावर आवश्यक त्याठिकाणी २१ सूचना फलक, १३ मोठे गॅन्ट्री फलक, लेन मार्किंग व इतर सुरक्षेच्या दृष्टिने आय.आर.सी. च्या मानकाप्रमाणे सर्व तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.
(२) हे खरे नाही.

सदर प्रकल्पातील सर्व लेनवर लेनची माहिती देणारे फलक आवश्यक त्याठिकाणी बसविण्यात आलेले आहेत. त्यामुळे वाहनचालकांची गैरसोय होत नाही.
(३) जुलै, २०२३ अखेर प्रकल्पाचे ९८ टक्के काम पूर्ण झाले असून दिनांक १२/०८/२०२३ रोजी प्रकल्प वाहतूकीसाठी खुला करण्यात आला आहे. वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी या परिसरातील अस्तित्वातील जूना पूल पाडून बावधन ते एन.डी.ए.- मूळ पूलाचे (व्हीओपी) काम पूर्ण झालेले असून पूल वाहतूकीसाठी खुला करण्यात आलेला आहे. तसेच इतर सर्व ८ मार्गिकांचे काम पूर्ण झालेले असून वाहतूकीसाठी सुरु करण्यात आला असून वाहतूक सुरळीतपणे सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्य कामगार विमा योजनेंतर्गत रुग्णालये सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत चालविण्याबाबत

(१२) २२९२५ (२०-०७-२०२४) श्री.सुनिल शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.राजहंस सिंह, श्री.सत्यजीत तांबे : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात राज्य विमा योजनेंतर्गत असलेली एकूण विमाधारक आणि विमा योजनेच्या रुग्णालयांत उपचार घेणाऱ्या रुग्णांची संख्या यांचे प्रमाण खूप जास्त असल्याचे माहे, एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालये राज्य कामगार विमा सोसायटीमार्फत चालविणे शक्य नसल्यास आरोग्य विभागामार्फत चालविण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश मा.आरोग्यमंत्री महोदयांनी संबंधित अधिकाऱ्यांना माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यासुमारास दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य कामगार विमा सोसायटीने सादर केलेल्या प्रस्तावाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश आबिटकर (२९-०४-२०२५) : (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात नोंदणीकृत विमाधारकांना व त्यांच्या कुटुंबियांना वैद्यकीय सेवा पुरविण्याकरीता राज्य कामगार विमा योजनेंतर्गत १२ राकावियो रूग्णालये व ११० राकावियो सेवा दवाखाने कार्यरत आहेत. तसेच ज्या राकावियो रूग्णालयांमध्ये पुरेशा सुविधा उपलब्ध नाहीत अशा ठिकाणी एकूण ३४ जिल्ह्यांमध्ये secondary medical care पुरविण्याकरीता २५६ खाजगी रूग्णालयांसोबत टाय-अप करण्यात आले असून super speciality treatment करीता राकावि महामंडळामार्फत १३२ खाजगी रूग्णालयांसोबत टाय-अप करण्यात आले आहेत.

तथापि, राकावियो रूग्णालय वरळी व मुलुंड च्या इमारती ५५ ते ६० वर्षे जुन्या होऊन मोडकळीस आल्या असल्याने सदर दोन्ही इमारतींचे पुर्नबांधकाम करावयाचे असल्याने दोन्ही ठिकाणी खाटांच्या संख्या कमी ठेवण्यात आल्या आहेत.

(२) हे खरे आहे.

तत्कालिन आरोग्य मंत्री महोदयांनी दिनांक ३१/०८/२०२३ रोजी झालेल्या बैठकीत राकावियो रूग्णालय वरळी व मुलुंड येथील विमारूग्णांची संख्या वाढविण्यासाठी व आवश्यक मनुष्यबळ व आवश्यक सोई सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात यावी तसेच वरळी व मुलुंड ही रूग्णालये राकावि योजनेंतर्गत चालविणे शक्य नसल्यास सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अंतर्गत चालविण्यासाठीचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराकावि सोसायटी, मुंबई यांना दिले होते.

(३) राकावियो रूग्णालय वरळी व मुलुंड च्या पुर्नबांधणीबाबत दिनांक १४/०१/२०२५ रोजी संपन्न नियामक मंडळाच्या १२ वी व १३ वी बैठकीमध्ये मांडण्यात आली असता नियामक मंडळाने सदर दोन्ही रूग्णालयाच्या पुर्नवांधणीसाठी फक्त आवश्यक तेवढी जमीन राकावि महामंडळास ९९ वर्षाच्या Lease वर हस्तांतरीत करावी, असे निर्देश दिले. त्याअनुषंगाने राज्य शासन, राकावि महामंडळ व सोसायटी यांच्यामध्ये करावयाचा MoU तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

(१३) २३३७९ (२०-०७-२०२४) डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.प्रसाद लाड : तारांकित प्रश्न क्रमांक १७००७ ला दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा देण्यात येऊन त्यांचे मानधन २५ हजारांपर्यंत करावे, अंगणवाडी सेविकांना ग्रॅच्यूयुईटी, सेवा समाप्तीनंतर पेन्शन, महानगरपालिका हद्दीत जागेचे निकष शिथील करुन अंगणवाड्यांसाठी ५ हजार ते ८ हजार पर्यंत भाडे मंजूर करावे, सर्वसाधारण बालकांच्या आहारासाठी १६ रुपये तर तीव्र कुपोषित बालकांसाठी २४ रुपये दर देण्यात यावा, तसेच मोबाईल देणे इ. अशा अनेक मागण्यांसाठी राज्यातील अंगणवाडी सेविका कर्मचाऱ्यांनी माहे नोव्हेंबर,

२०२३ मध्ये वा त्यादरम्यान राज्यात विशेषत: नागपूर, छत्रपती संभाजीनगर, पालघर, रायगड, मुंबई या जिल्ह्यात महाराष्ट्र राज्य अंगणवाडी सेविका कर्मचारी कृती समितीच्या वतीने संप आणि आंदोलने केली असून तसेच मुंबईतील आझाद मैदानात दिनांक ३ डिसेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास ठिय्या आंदोलन सुरु केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांची पूर्तता करण्याबाबत शासनाकडून कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

कुमारी आदिती तटकरे (२२-०४-२०२५) : (१) हे खरे आहे.
(२) व (३) अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांच्या अनुषंगाने अंगणवाडी कर्मचारी संघटनासमवेत वेळावेळी बैठक आयोजित करुन कार्यवाही करण्यात येते.

उंब्रज (ता.कराड जि.सातारा) गावातील नावे ७/१२ वर नोंदविण्याबाबत

(१४) २३३९९ (१८-०७-२०२४) श्री.राजेश राठोड : तारांकित प्रश्न क्रमांक १९१४४ ला दिनांक १९ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उंब्रज (ता.कराड, जि.सातारा) येथे सन १९६७ मध्ये झालेल्या भुकंपात अनेक मागासवर्गीयांची घरे जमीनदोस्त झाली असून तसेच सन २०१९ मध्ये कृष्णा नदीला आलेल्या महापुरामुळे अनेकांची घरे वाहून गेल्यामुळे बेघर झालेल्या या मागासवर्गीय समाजासाठी उंब्रज गावातील सर्व्हे नं. ४५/१, ४५/२, ४५/३ हे क्षेत्र पुनर्वसन करण्यासाठी ११६ प्लॉटची आखणी करुन त्यांना भूखंड देण्यात आले असून या ११६ भुंखडधारकापैकी केवळ २७ भुखंडधारकांचीच ७/१२ वर नोंद घेण्यात आली असल्याचे माहे, मार्च २०२४ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उर्वरित ८९ मोजणी झालेल्या पात्र भुखंडधारकांची नावे ७/१२ वर नोंद घेण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, सातारा यांचेकडून सुमारे एक वर्षापासून सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त विषयासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पात्र ८९ भूखंड धारकांची नावे ७/१२ वर नोंद घेण्याचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.मकरंद जाधव (पाटील)(०३-०३-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
सदर ठिकाणी आज रोजी १४७ लोक पक्की घरे असून त्यामध्ये अतिक्रमण धारक यांचे वास्तव्य आहे. सदर १४७ अतिक्रमण धारकांच्या नोंदी ग्रामपंचायत नमुना नं. ८ उताऱ्यावर घेण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार त्यांना ग्रामपंचायत, उंब्रज यांचेकडून १८ नागरी सुविधा उपलब्ध करून देणेत आलेल्या आहेत.

उपविभागीय अधिकारी, कराड कार्यालयाकडील पत्र क्र. गावठाण/कावि-२०४/२१७/१२, दिनांक १३/०७/२०१२ अन्वये उप अधीक्षक, भूमी अभिलेख यांचेकडील मोजणी नकाशात दर्शविलेनुसार वहिवाटी प्रमाणे फेर रेखांकन आराखडा करणेकामी सहा. संचालक, नगररचनाकार यांचे कडे फेर ले आऊट करून मंजूरी मिळणेबाबत विनंती केली असता सहा. संचालक, नगर रचना, सातारा यांनी सदर प्रकरणी खालीलप्रमाणे अडचणी येत असलेबाबत कळविले आहे.

१. रेखांकना मधील उत्तरेकडील बाजूची बांधकामे रेखांकनाच्या हद्दीबाहेर झाली असल्याची दिसून येतात.

२. बहुतांशी भूखंडामध्ये सामासिक अंतरे न सोडता बांधकामे झाली असलेचे दिसून येते.

३. काही भूखंडामधील बांधकामे दुसऱ्या भूखंडाच्या हद्दीमध्ये अतिक्रमण करून झाली असल्याचे दिसून येते.

४. काही भूखंडामध्ये एकापेक्षा जास्त बांधकामे झाली असल्याचे दिसून येते.

५. कॅनॉलच्या जागेमध्ये बांधकामे झाली असल्याचे दिसून येतात. वास्तविकपणे सदरची जागा कायमस्वरूपी खुली ठेवणे आवश्यक आहे.

६. रेखांकनातील सर्व खुल्या जागांमध्ये बांधकामे झाली असलेने ती नियमित करणे योग्य होणार नाहीत.

७. जागेतील अस्तित्वातील बांधकामामुळे एकूण ११६ भूखंड निश्चित करता येत नाहीत.

उपरोक्त, नमुद बाबीमुळे तसेच नव्याने दर्शविलेले भूखंडानुसार सुधारीत रेखांकन आराखडा अंतिमरीत्या तयार करणे शक्य होत नाही. नियमानुसार भूखंड पाडणे व सामासिक अंतर सोडणे आवश्यक असल्यामुळे काही नियमाव्यतिरीक्त झालेल्या इमारती पाडाव्या लागणार असून याबाबत योग्य तो निर्णय घेतल्यानंतर रेखांकनाबाबत योग्य ती कार्यवाही करता येईल असे सहा. संचालक, नगररचनाकार, सातारा यांनी कळविले आहे.

त्यानुषंगाने, जिल्हाधिकारी, सातारा यांच्या दिनांक ०७/०३/२०२४ रोजीच्या पत्रान्वये चालू वहिवाटीप्रमाणे मोजणी पूर्ण करुन वाहिवाटीनुसार फेर लेआऊट तयार करणेसाठी सहायक संचालक नगररचना विभाग, सातारा यांचेकडे पाठविलेला आहे. सदर वहिवाटीनुसार फेरलेआऊट होवून सदर रेखांकनाच्या नकाशास मान्यता देण्याची कार्यवाही सहायक संचालक नगररचना विभाग, सातारा यांच्या स्तरावर सुरु आहे. तथापि, सहायक संचालक नगररचना विभाग, सातारा या विभागाची मान्यता मिळाल्यास तात्काळ भुखंडास संबंधितांची नावे ७/१२ स लावण्याची कार्यवाही पूर्ण करता येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

रायगड जिल्ह्यातील पोलादपूर तालुक्यातील उमरठ येथे नरवीर तानाजी मालुसरे समाधी स्थळ सुशोभीकरणासाठी दहा कोटी रुपयाचा निधी देणार असल्याबाबत

(१५) २३५६६ (२९-०६-२०२४) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे : सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरठ (ता.पोलादपूर,जि.रायगड) येथे नरवीर तानाजी मालुसरे यांच्या ३५४ व्या पुण्यतिथीनिमित्त नरवीर तानाजी मालुसरे यांचे समाधी स्थळ व परिसर सुशोभीकरणाच्या कामाचा शुभारंभ मा.मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते दूरदृष्यप्रणालीद्वारे करण्यात आला असल्याची बाब माहे मार्च २०२४ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या समारंभाच्या वेळी नरवीर तानाजी मालुसरे समाधी स्थळ सुशोभीकरणासाठी दहा कोटी रुपयाचा निधी देणार असल्याची घोषणा मा.मुख्यमंत्री महोदयांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.शंभूराज देसाई (२४-०६-२०२५) : (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) पर्यटन विभाग, शासन निर्णय दिनांक १८/०३/२०२५ अन्वये श्री तानाजी मालुसरे स्मारक सुशोभिकरणासाठी रुपये १०.०० कोटी रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

सार्वजनिक आरोग्य विभागात वरिष्ठ व कनिष्ठ अधिकाऱ्यांची पदे अनेक वर्षांपासून रिक्त असल्याबाबत

(१६) २३५७१ (२०-०७-२०२४) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण : दिनांक ८ जुलै, २०२४ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ८ मधील प्रश्न क्रमांक २१०४७ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागात २ संचालक, ४ अतिरिक्त संचालक, ५ सहसंचालक, २३ उपसंचालक या प्रमुख पदांसह जिल्हा आरोग्य अधिकारी संवर्गातील १२१, जिल्हा शल्यचिकित्सक संवर्गातील ३३८, तज्ज्ञ डॉक्टरांची ४७९, “अ” श्रेणीतील वैद्यकीय अधिकाऱ्यांची ९८३ तर “ब” श्रेणीतील २३८ पदे बऱ्याच कालावधीपासून रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आरोग्य विभागातील किती पदे पदोन्नतीने माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यासुमारास भरली आहेत तसेच रिक्त असलेल्या पदांचा जिल्हानिहाय तपशिल काय आहे
(३) असल्यास, सदर पदे भरण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली जात आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश आबिटकर (२८-०४-२०२५) : (१) हे अंशत: खरे आहे.
(२)मवैआसे गट-अ (वेतनस्तर एस-२३) मधील जिल्हा शल्य चिकित्सक,जिल्हा आरोग्य अधिकारी, विशेषज्ञ या संवर्गातील माहे मार्च, २०२४ मध्ये एकूण २१६ पदाचे पदोन्नतीचे आदेश निर्गमित केलेले आहेत.
(३) रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती संयुक्त प्रवेश परीक्षेबाबत

(१७) २३८२३ (२२-०७-२०२४) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विद्यावाचस्पती (पीएचडी) करीता छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती संयुक्त प्रवेश

परीक्षा नुकतीच पार पडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या परीक्षेत सन २०१९ मधील सेट परीक्षेतील पेपर क्रमांक १ जसाच्या तसा देण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी कली आहे काय,चौकशीच्या अनुषंगाने सदरहू परीक्षेबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(४) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री.अजित पवार (१७-०६-२०२५) : (१) होय हे खरे आहे.
(२) होय हे खरे आहे.
बार्टी, सारथी व महाज्योती या संस्थेच्या विद्यार्थ्यांची संशोधन अधिछात्रवृत्तीसाठी निवड करण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत संयुक्त परीक्षा दिनांक २४ डिसेंबर, २०२३ रोजी घेण्यात आली होती. परंतु सदर परीक्षेतील प्रश्नपत्रिका ही सन २०१९ मधील सेट परिक्षेच्या प्रश्नपत्रिकेची तंतोतत प्रत असल्याने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने दिनांक २४ डिसेंबर, २०२३ रोजी घेण्यात आलेली परीक्षा रद्द करून दिनांक १० जानेवारी, २०२४ रोजी फेरपरीक्षा आयोजित केली. दिनांक १० जानेवारी, २०२४ रोजी घेण्यात आलेल्या परिक्षेत संच क व ड या संचाच्या प्रश्नपत्रिका सीलबंद नसल्याचे निदर्शनास आल्याने सदरची परीक्षाही रद्द करण्यात आली.
(३) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, दिनांक २५ जुलै, २०२४ अन्वये बार्टी, सारथी व महाज्योती या संस्थामार्फत अधिछात्रवृत्तीबाबत देण्यात आलेल्या जाहिरातींनुसार आलेल्या अर्जांमधील कागदपत्रांची पडताळणी करून व शपथपत्र घेऊन पात्र संशोधक विद्यार्थ्यांना ५० टक्के दराने सरसकट अधिछात्रवृत्ती मंजूर करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

अमृत योजनेतर्गत चंद्रपुर शहराला महानगरपालिकेमार्फत पाणीपुरवठा होत नसल्याबाबत

(१८) २३९०२ (१६-०७-२०२४) श्री.सुधाकर अडबाले : तारांकित प्रश्न क्रमांक १९४२३ ला दिनांक २ ऑगस्ट, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१)चंद्रपुर शहराला अमृत योजना १ अंतर्गत अद्यापही पाणीपुरवठा सुरू झालेला नसताना अमृत २.० योजनेचे भूमिपूजन करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०२४ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चंद्रपूर शहरात अमृत योजनेंतर्गत अनेक वॉर्डात नळ जोडणी करण्यात आली मात्र, अजूनही नळाला पाणी आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शहरात आधी जोडण्यात आलेल्या पाईपलाईनद्वारे पाणीपुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री.एकनाथ शिंदे (०४-०४-२०२५) : (१), (२), (३) व (४) केंद्र पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत चंद्रपूर शहराच्या पाणीपुरवठा प्रकल्पास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे.

सदर योजनेंतर्गत शहरातील पाईपलाईन अंथरण्याचे व टाक्याचे बांधकाम पूर्ण करण्यात आलेले आहे. तसेच, सदर योजनेंतर्गत एकूण ५०८९१ नळ जोडण्या देण्यात आल्या असून शहरास पाणीपुरवठा करण्यात येत असून अमृत १.० योजनेंतर्गत कामाचा वाव पूर्ण झालेला आहे.

चंद्रपूर शहराला मुख्यतः पाणीपुरवठा ईरई धरण व ईरई नदीवरून होतो. दोन्ही ठिकाणावरून उचल करण्यात येणारा पाणीसाठा शहराच्या पाण्याची मागणीच्या तुलनेत कमी असल्यामुळे शहरात एक दिवसआड पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

तद्नंतर, चंद्रपूर शहरातील पाणी पुनर्प्रक्रिया करून चंद्रपूर महाऔष्णिक केंद्रास पाणी देण्याचा प्रकल्प कार्यान्वित झाल्यामुळे पुनर्प्रक्रिया केलेल्या पाण्याचे मोबदल्यात ईरई धरणावरून उचल करण्यात येणाऱ्या पाणी साठ्यामध्ये वाढ करण्यात आली. त्यामुळे, अतिरिक्त पाणी उपलब्ध झाल्यामुळे अमृत २.० योजनेंतर्गत चंद्रपूर महानगरपालिकेने प्रस्ताव तयार केला असून सदर प्रकल्पाचे दिनांक ११ मार्च, २०२४ रोजी तत्कालीन मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले आहे.

अमृत २.० योजनेंतर्गत प्रस्तावित प्रकल्पामुळे शहराची पाण्याची मागणी पूर्ण होत असल्यामुळे सदर प्रकल्पामध्ये शहरातील ३४००० नवीन नळ कनेक्शन प्रस्तावित करण्यात आलेले असून सदर प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर शहरात नियमित पाणीपुरवठा करण्यात येईल.

खेट्री, राहेर, अडगांव (ता.पातूर, जि.अकोला) गावांतील शेतकऱ्यांना शेतीच्या नुकसानीबाबतच्या सर्वेक्षणातून वगळण्यात आल्याबाबत

(१९) २३९१३ (१८-०७-२०२४) श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेट्री, राहेर, अडगांव (ता.पातूर, जि.अकोला) गावांतील शेतकऱ्यांना मागील दोन ते तीन वर्षांपासून नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या शेतीच्या नुकसानीचे सर्वेक्षणातून वगळण्यात आल्याबाबत माहे मे,२०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तलाठी यांचा कार्यभार सांभाळण्याकरीता गावांत खाजगी व्यक्तींची नियुक्ती करण्यात आली असल्याबाबत तसेच तलाठी यांच्या मनमानी कारभाराबाबत खेट्री,राहेर,अडगांवच्या सरपंचानी मा.तहसीलदारांकडे निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.मकरंद जाधव (पाटील)(०४-०३-२०२५) : (१) हे खरे नाही.

(२) व (३) तलाठी यांचा कारभार चालविण्याकरीता खाजगी व्यक्तींची नियुक्ती केल्याबाबतची तक्रार खेट्री येथील सरपंच यांनी दिनांक २४/०४/२०२४ रोजी व राहेर येथील सरपंच यांनी दिनांक ०२/०५/२०२४ रोजी तहसिल कार्यालय, पातूर जि.अकोला यांचेकडे केली आहे.

त्याअनुषंगाने या प्रकरणाचा तपास करण्याकरीता तहसिलदार, पातूर यांनी मंडळ अधिकारी व कृषी

मंडळ अधिकारी यांची चौकशी समिति नेमली होती. चौकशी समितीने त्यांचा अहवाल दिनांक १०/०६/२०२४ रोजी तहसिलदार, पातूर यांना सादर केला आहे. सदरहू अहवालात तक्रारदार यांना पुरावे सादर करण्याबाबत मुदत देऊनही तक्रारदारांनी समितीला पुरावे सादर केले नाहीत, त्यामुळे तक्रारीत तथ्य आढळुन आले नाही. असे चौकशी समितीच्या अहवालात नमूद आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

नाशिक जिल्ह्यात अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानाची भरपाई मिळणेबाबत

(२०) २४२९७ (०८-०८-२०२४) श्री.सत्यजीत तांबे : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यातील सिन्नर, निफाड, मालेगाव, नांदगाव व देवळा तालुक्यात पडलेल्या अवकाळी पावसामुळे पिकांचे तसेच नागरिकांच्या राहत्या घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे दिनांक १२ मे,२०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चांदवड तालुक्यात वीज अंगावर पडून शोभा निकम या महिलेचा मृत्यू झाला असून तसेच सिन्नर तालुक्यातील कृष्ण नगरातील राहत्या घरांच्या भिंती कोसळून १२ जनावरांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने नुकसानग्रस्तांना व मृतांच्या नातेवाईकांना मदत देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री.मकरंद जाधव (पाटील)(०७-०३-२०२५) : (१), (२) व (३) नाशिक जिल्ह्यात मे २०२४ या कालावधीमध्ये अवकाळी पावसामुळे झालेल्या शेतीपिकांचे व फळपिकांचे नुकसानीबाबत शासन निर्णय क्रमांक सीएलएस २०२३/प्र.क्र.२८६(II)/म-३, दिनांक ०२ ऑगस्ट, २०२४ अन्वये ७०६.१३ लक्ष रुपये निधी वितरीत करण्यास मंजूरी देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे नाशिक जिल्ह्यात मयत पशुधन करीता एकूण ४.३६ लाख व घरपडझडीकरीता एकूण २०.०० लाख इतके अनुदान वितरीत करण्यात आले आहे.

चांदवड तालुक्यात श्रीमती शोभा कैलास निकम या महिलेचा दिनांक १२/०५/२०२४ रोजी अपघाती घडलेला मृत्य हा विज कोसळाल्याने झालेला नसून Cardio repiratory arrest मुळे झालेला असल्याचे दिसुन आल्याने मदत अनुज्ञेय नाही. तसेच सिन्नर तालुक्यात कृष्णनगरातील राहत्या घरांच्या भिंती कोसळून जनावरांचा मृत्यू झाल्याची घटना घडलेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

जितेंद्र भोळे
सचिव-१,
महाराष्ट्र विधानपरिषद.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.